## मुठा नदीपात्रातील स्वच्छता अभियानाने महामेट्रोच्या प्रथम वर्धापनदिन साजरीकरणास सुरवात

**· 'महामेट्रो'तर्फे 'स्वच्छ पुणे सुंदर पुणे'चा जागर**

पुणे, दि. १९ जानेवारी, २०१८ : पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात सध्या 'महामेट्रो'च्या वतीने मेट्रो प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. येत्या मंगळवार दि. २३ जानेवारी, २०१८ रोजी सदर काम सुरू झाल्याची वर्षपूर्ती होत आहे. याबरोबरच नागपूर आणि पुणे मेट्रो यांचे 'महामेट्रो' रुपांतर झाल्याला देखील एक वर्ष पूर्ण होत आहे. याचेच औचित्य साधत महामेट्रोच्या वतीने आजपासून या प्रथम वर्धापनदिन साजरीकरणास सुरुवात झाली.

मुठा नदीपत्रातील पांचाळेश्वर ते वृध्देश्वर मंदिरादरम्यान तब्बल १.४ किमीच्या परिसरात स्वच्छता मोहीम आयोजित करीत या वर्धापन दिनाला आजपासून सुरुवात झाली. स्वच्छ पुणे, सुंदर पुणे'चा जागर करीत'महामेट्रो' आणि 'जनरल कन्सलटन्स'च्या (जीसी) अधिकारी, महामेट्रोचे कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नागरीकांनीही यावेळी या स्वच्छता अभियानात भाग घेतला. दरम्यान,'युरोपीयन इनव्हेस्टमेंट बँके'च्या (इआयबी) प्रतिनिधींनी मेट्रोच्या नदीपात्रातील कामाची आणि स्वच्छता अभियानाची पाहणी करीत महामेट्रो करीत असलेल्या कामाचे कौतुक केले. या स्वच्छता मोहिमे अंतर्गत तब्बल २५० बॅग भरून कचरा गोळा करण्यात आला, ज्यामध्ये नदीपात्रात टाकले गेलेल्या प्लास्टिकचे प्रमाण मोठे होते.

आज पासून सुरू झालेल्या या वर्धापन दिन कार्यक्रमां अंतर्गत २० जानेवारी रोजी पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील शाळांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. याबरोबरच २१ जानेवारी रोजी 'वसंतोत्सव' संगीत महोत्सवात'महामेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित मेट्रोसंबंधी नागरिकांशी संवाद साधतील. तर मंगळवार दि. २३ जानेवारी रोजी शनिवारवाडा येथे महामेट्रोच्या वतीने एका विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी लोकप्रतिनिधी आणि मान्यवर व्यक्ती या कार्यक्रमासाठी उपस्थित असतील.